**Email व्दारे**
**न्यायालयीन प्रकरण / अल्पसमय मर्यादा**

क्र.शिनि/पवि/DCPS/वेभपा/
शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई
पश्चिम विभाग यांचे कार्यालय
आय. वाय. कॉलेज कंम्पाउड,
जोगेश्वरी (पूर्व), मुंबई-६०
दिनांक : १०.०९.२०१३

प्रति,
सर्व शिक्षण उपनिरीक्षक / सहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक
पश्चिम विभाग

**विषय : नवीन परिभाषित अंशदायी निवृत्ती योजना (DCPS)**

**संदर्भ :** क्रपीईएम/२०११/१५.८(०२)/८७३७ दि.०६.०७.२०१३
(सुलभ संदर्भासाठी सोबत जोडलेले आहे.)

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेशान्वये आपणास सुचित करण्यात येते की, आपल्या विभाग / उपविभागमधील सर्व खाजगी अनुदानित शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांतील ज्या शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी दि.०१ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त कर्मचाऱ्यांना लागू होणाऱ्या नवीन परिभाषित अंशदायी निवृत्ती वेतन योजनेच्या (DCPS) संदर्भात विविध न्यायालयामध्ये याचिका दाखल केल्या असतील तर अशा न्यायालयीन प्रकरणाची माहिती त्यांना मा. उच्च न्यायालयात सादर करावयाची आहे.

गणेशोत्सवानिमित्त सर्व शाळांना दि.०९ सप्टेंबर २०१३ ते १२ सप्टेंबर २०१३ दरम्यान सुट्टी जाहीर असल्याने उपरोक्त माहिती विहीत वेळेत संकलित करणे शक्य होणार नसल्याने आपण वैयक्तीकरित्या आपल्या विभागातील शाळांच्या मुख्याध्यापक / उपमुख्याध्यापकांशी संपर्क साधून त्यांचे शाळेशी संबंधित न्यालयीन प्रकरण असल्यास त्याबाबतची माहिती विहीत नमुन्यात भरुन दि. ११.०९.२०१३ रोजी सांय.४.३० वाजेपर्यंत श्री. शिवलकर, सहाय्यक लेखा अधिकारी यांच्याकडे समक्ष पाठवावी व त्याची पोहोच घ्यावी. तसेच संदर्भिय पत्रामधील शेवटच्या परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ते पुरावे संकलित करुन ते या कार्यालयाकडे पाठवावेत. **निरंक असल्यास तसा अहवाल पाठवावा.**

**न्यायालयीन प्रकरण असल्याने दिलेली कालमर्यादा कटाक्षाने पाळावी.**

10/9/13
(नितीन बच्छाव)
शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई
पश्चिम विभाग

प्रत : माहितीस्तव सविनय सादर
मा. शिक्षण उपसंचालक मुंबई विभाग मुंबई

Y:\PAY UNIT\dcps 10.09.2013.doc

अतितात्काळ

मा. उच्च न्यायालय प्रधान्य

क्रमांक पीईएन/२०११/१५-क(०२)/

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय,

महाराष्ट्र राज्य ,पुणे-१ दिनांक ६/९/२०१३

प्रति

१. सर्व शिक्षणाधिकारी (माध्य) ,
   जिल्हा परिषद.

२. शिक्षण निरीक्षक,
   (उत्तर/दक्षिण/पश्चिम), बृहन्मुंबई.

३. सर्व अधीक्षक,
   वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्य.)

विषय - नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजने ऐवजी सर्व साधरण भविष्य निर्वाह निधी योजना लागू करण्याबाबत आपल्या जिल्हयातील मा. उच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकांची माहिती देणेबाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुंषगाने आपल्या जिल्हयात मा. उच्च न्यायालयात आतापर्यंत किती याचिका दाखल झालेल्या आहेत.त्या याचिकाचे क्रमांक, नावे व शाळेचे नाव, याचिकादारांची संख्या रूजू दिनांक, सहाय्यक शिक्षक पदावर आलेला कायम दिनांक, मा. उच्च न्यायालयाने दिलेले आदेश, सद्यास्थिती याबाबतची माहिती दिनांक १३/९/२०१३ रोजी पर्यंत ई-मेल/पत्रा द्वारे सोबत दिलेल्या विवरण पत्रात सादर करण्यात यावी .

याबाबत मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दि. १५/९/२०१३ रोजी शासनास आपले म्हणणे सादर करावयाचे असल्याने आपली विहीत नमुन्यात आवश्यक त्या पुराव्या सहित माहिती खासदूतामार्फत सादर करावी. दिलेली कालमर्यादा कटाक्षाने पाळावी.

(सर्जेराव जाधव)
शिक्षण संचालक,
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)

प्रत माहितीसाठी-

१. मा.श्री. प्र. सु. प्रधान, अवर सचिव (माशि-२), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२.

२. सर्व विभागीय उपसंचालक, यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजने ऐवजी सर्व साधरण भविष्य निर्वाह निधी योजना लागू करण्याबाबत दाखल झालेल्या याचिकांचे विवरण पत्र

जिल्हाचे नाव -

| अं क्र. | याचिकांचे क्रमांक | याचिकादारांची संख्या | याचिकादाराची नाव | माध्यमिक शाळेचे नाव | सदर शाळेत रूजू दिनांक | शिक्षक सेवक पदावरील कायम दिनांक. | मा. उच्च न्यायालयाचे आदेश | सद्यास्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

**प्रमाणपत्र**:- वरील माहिती मी स्वतः पडताळून देत आहे.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरी<br>अधीक्षक,<br>वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्य.) | स्वाक्षरी<br>शिक्षणाधिकारी (माध्य.)<br>जिल्हा परिषद | स्वाक्षरी<br>शिक्षण निरीक्षक<br>उत्तर/दक्षिण/पश्चिम), बृहन्मुंबई |